# अर्थपूर्ण

ऑक्टोबर २०१३ | ₹ ४०
पुणे, वर्ष ३, अंक १०

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत



| मुख्य संपादक | संपादक | सहसंपादक |
| --- | --- | --- |
| यमाजी मालकर | प्रसाद मिरासदार | सम्राट शिरवळकर |

editor.arthapurna@gmail.com

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

**ऑक्टोबर २०१३**

वर्ष तिसरे
अंक दहावा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**अक्षर जुळणी :** माधुरी खत्री

**मुद्रितशोधन :** विजय जोशी
**मुखपृष्ठ चित्रकार :** आशिष कारेकर

**व्यवस्थापन साहाय्य :**
स्वप्नील भिलारे

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन,
बी १, यशोराम अपार्टमेंट,
४३६-ए, नारायण पेठ,
पत्र्यामारुती गल्ली,
पुणे-४११०३०
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

# अनुक्रमणिका

०८ **यापेक्षा अधिक काय लागते महासत्ता होण्यासाठी ?...**यमाजी मालकर

१० **युवा मंथन २०१३...**प्रकाश असलेकर

१२ **निबंध स्पर्धा एक अनुभव...**प्रा. शांताराम कुलकर्णी

१४ **भित्तिचित्र स्पर्धेच्या परीक्षकाचे मनोगत...**आशिष कारेकर

१५ **वक्तृत्व स्पर्धेच्या परीक्षकाचे मनोगत...**रवींद्र कुलकर्णी

१६ **माझ्या स्वप्नातील भारत...!...**ऋजुता मिलिंद जोशी

२० **मी अर्थमंत्री झाले तर....**मोनाली सुधाकर सोनार

२४ **काळ्या पैशांचा विळखा सुटेल कसा...**सायली शांताराम कांबळी

३१ **परीक्षेचा काळ ...**जयंत मराठे

३३ **आयुर्विमा उद्योगासमोर बदलांचे आव्हान!...**यशराज

३५ **नवे वर्ष सुखाचे जावो...**विजय तरवडे

३७ **कर बचत नव्हे, कर नियोजन हवे !..**अरविंद जी. देशमुख

४० **'स्टॉप अ‍ॅन्ड रिवर्स' ट्रेडिंग...**संदीप साठे

४२ **तरुणाई आणि बँकिंग...**वंदना धर्माधिकारी

४४ **बनावट नोटांबाबत खबरदारी...**सुरेंद्र जोशी

४५ **आमचाही संवाद, युवतीशी...**रवी तांबोळी

४७ **निवडणुकीसाठी बिनमहत्त्वाच्या गोष्टी...**अजय महाजन

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

भूमिका

# यापेक्षा अधिक काय लागते महासत्ता होण्यासाठी ?



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**भारतीय माणसाच्या वृत्तीवर हजारो वर्षे बोलले जाते आहे तसे ते आजही बोलले जाते आहे आणि भविष्यातही बोलले जाणार आहे. माणसाची वृत्ती सुधारण्याचा प्रवास असा निरंतर सुरूच राहणार आहे. बदल हवा असे म्हणणाऱ्या प्रत्येकाने आता व्यवस्थेवर बोलले पाहिजे, हे मात्र फार कमी जणांच्या लक्षात येते आहे. ज्यांना भारतीय माणसांच्या वृत्तीवरच बोट ठेवायचे आहे, त्यांच्यासाठी १० प्रश्न मी येथे मुद्दाम उपस्थित करत आहे...**

‘माझ्या स्वप्नातील भारत’ या विषयावर तरुण नेमके काय लिहितात आणि तरुणांच्या मनात आज काय दडले आहे, हे जाणून घेताना ऋजुता मिलिंद जोशी या स. प. महाविद्यालयातील विद्यार्थिनीचे मनोगत वाचण्यात आले आणि तरुणांच्या मनात या देशाविषयी किती प्रचंड प्रेम आहे आणि त्यांना हा देश सुजलाम सुफलाम करण्याची किती दुर्दम्य इच्छाशक्ती आहे, याची झलक पाहायला मिळाली. अगदी भावनिकच विचार करायचा तर तरुणांच्या मनातील हा निखळ प्रामाणिकपणा आनंद देऊन जातो. वयाने मोठी झालेली माणसे देशाची जी चिंता करत असतात, ती आणि तरुणांच्या मनातील चिंता यात एक महत्त्वाचा फरक आहे, तो म्हणजे मोठ्या माणसांनी काय जगायचे ते जगून झाले आहे. त्यामुळे व्यवस्थेविषयी ते बोलतात तेव्हा त्यातील बहुतेक त्यातून स्वत:ला वगळून टाकतात. त्यांचे व्यवस्थेतील ‘स्टेक’ म्हटले तर कमी कमी होत चाललेले असतात. त्यामुळे बदल झाला पाहिजे, असे ते म्हणतात तेव्हा त्यात म्हणावा तेवढा जोर नसतो. बदल झालाच पाहिजे, असे ते म्हणत नाहीत. तरुण मात्र बदल झालाच पाहिजे, असे म्हणत आहेत, कारण त्यांचा आजच्या व्यवस्थेत १०० टक्के ‘स्टेक’ आहे आणि ते हे मान्य करत आहेत, हे आज सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

ऋतुजा हिने तिच्या निबंधात मार्क ट्वेन यांच्या एका विचाराचा दाखला दिला आहे. "The Destiny may rules the life of human but the reality is The God confides the human to create his own Destiny' असे ते वाक्य आहे. पण तिने पुढे जे म्हटले आहे ते जास्त महत्त्वाचे आहे. ती म्हणते, ‘जर हे भाग्य हे माणसाच्या कष्टांवर, जिद्दीवर अवलंबून असेल, तर माझ्या देशाचे भाग्यही माझ्यासारख्याच सगळ्या भारतीयांच्या हातात आहे... आपल्याच हातात आहे. या आपल्या महान राष्ट्रात पुन्हा एकदा सोन्याचा धूर निघण्याइतकी बौद्धिक, आर्थिक आणि वैज्ञानिक संपन्नता आणणे, याच विचाराने माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले आपल्या संपन्न, सुजलाम-सुफलाम्, महासत्ता बनलेल्या, प्रगतिशील, विकसित भारताचे सोनेरी स्वप्न!’

तरुणांची इतर मनोगतेही मग मी वाचून काढली. मला जाणवले की सर्वांनाच देश सुजलाम सुफलाम करायचा आहे. इतिहासात या देशात सोन्याचा धूर निघत होता, याचीही माहिती सर्वांना आहे. आपले माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी २०२० मध्ये आपला देश महासत्ता होईल, असे स्वप्न दाखविले, याचाही मोठा परिणाम तरुणांवर झालेला आहे. आणखी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे भविष्यात देश कसा असावा, याविषयी फार कोणाचे दुमत नाही. जवळपास सर्वांना सारखेच वाटते आहे. फक्त एकच उणीव आहे आणि ती फार महत्त्वाची आहे, ती म्हणजे हा देश सुजलाम सुफलाम, महासत्ता,

संपन्न कसा होईल, याचा काही ठोस मार्ग कोणाकडेच नाही. ज्या मोजक्या तरुणांनी देश बदलण्याचे जे प्रस्ताव मांडले आहेत, ते एक तर भावनिक आहेत किंवा स्वप्नाळू आहेत. म्हणजे बहुतेकांनी भारतीयांना बदलण्याची भाषा वापरली आहे. त्यांना भारतीय माणूस कोठेतरी कमी पडतो आहे, असे सुचवायचे आहे. काही जण तर भारतीय माणसाच्या वृत्तीवरच तुटून पडले आहेत. भारतीय माणसाच्या वृत्तीवर हजारो वर्षे बोलले जाते आहे तसे ते आजही बोलले जाते आहे आणि भविष्यातही बोलले जाणार आहे. माणसाची वृत्ती सुधारण्याचा प्रवास असा निरंतर सुरूच राहणार आहे. बदल हवा असे म्हणणाऱ्या प्रत्येकाने आता व्यवस्थेवर बोलले पाहिजे, हे मात्र फार कमी जणांच्या लक्षात येते आहे.

ज्यांना भारतीय माणसांच्या वृत्तीवरच बोट ठेवायचे आहे, त्यांच्यासाठी १० प्रश्न मी येथे मुद्दाम उपस्थित करत आहे. मला वाटते त्या प्रश्नांची उत्तरे शोधली तर आज देशात आर्थिक साक्षरता आणि अर्थक्रांतीचे पाच प्रस्ताव किती महत्त्वाचे आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज पडणार नाही.

१. ज्या देशात २२ हजार टन सोने पडून आहे, त्या देशाने इतर देशांकडे भांडवलाची भीक मागावी, हे आपणास योग्य वाटते का?
२. संपत्ती आणि इतर आर्थिक निकष लावले तर आजच हा देश महासत्ता आहे, मग आपल्या व्यवस्थेतील विसंगती शोधून त्या दुरुस्त करणे, हा खरा मार्ग नव्हे काय ?
३ पुरेशी साधने आणि पायाभूत सुविधांच्या अभावी आमच्यात वितुष्ट निर्माण होते आहे, हे आपण समजून घेणार आहोत काय ?
४. आपल्याच देशातील समूह बदनाम करतांना आपण आपल्यालाच बदनाम करतो आहोत, हे आपल्या लक्षात आले आहे का ?
५. देशाच्या अर्थरचनेत काळ्या पैशांचे प्रमाण आज पांढऱ्या पैशांपेक्षा अधिक झाल्याने सर्व समाजाची कोंडी झाली आहे, ती आपण समजून घेणार आहोत काय?
६. आपल्या देशातील आगामी निवडणूक भावनिक आवाहनांवर न होता ठोस मुद्द्यांवर व्हावी, असे आपल्याला वाटते का?
७. आपल्या व्यवस्थेत पैशीकरणामुळे प्रचंड लाचारी आणि मुजोरी वाढली आहे. मानवी प्रतिष्ठेची मानहानी करणाऱ्या या दोन्हींविरुद्ध आपण लढणार आहोत काय?
८. या महाकाय देशातील १२३ कोटी भारतीयांना त्यांचे समाजाला घातक नसलेले वैविध्य अबाधित ठेवून जगायचे असेल तर भेदभावमुक्त, पारदर्शी, समन्यायी व्यवस्थेशिवाय पर्याय नाही, हे आपल्याला पटते काय?
९. आपल्याला आपले सार्वजनिक आयुष्य सुधारण्यासाठी आपल्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांना सक्षम करावे लागेल, याविषयी काही दुमत आहे काय?
१०. जगातील १९३ देशांतील किती देशांवर निसर्गाने भारतासारखी कृपा केली आहे?




सर्व निर्मितीचे मूळ असलेला सूर्यप्रकाश, काही अपवाद सोडता उत्तम पाऊस, तीनही बाजूंनी समुद्र, हिमालयासारख्या प्रचंड पर्वतरांगा, जगातील सातव्या क्रमांकाची जमीन, जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असताना गेली चाळीस वर्षे अन्नधान्यात संपूर्ण स्वयंपूर्णता, दूध उत्पादनात जगात पहिला, परदेशी नोकऱ्या आणि उद्योग व्यवसाय करून जगातून सर्वाधिक परकीय चलन आणणारे तरुण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जगातील सर्वाधिक तरुण असलेला म्हणजे सतत स्वप्न पाहणारा देश आणि शांत, प्रामाणिक आयुष्य जगण्यावर प्रेम करणारा आणि हे विश्वचि माझे घर असे म्हणणारा सर्वसामान्य भारतीय माणूस...यापेक्षा अधिक काय लागते महासत्ता होण्यासाठी ?